## परिस्थितीचा स्फोट झाला तर ॲटमबाँबपेक्षाहि तो भयंकर ठरेल


# विनोबा-वार्ता

दैनिक साम्ययोग

मासिक वर्गणी १.५० न. पै.

अंक : १२० ) वर्धा, बुधवार ता. ५ ऑगस्ट १९६४ ( मूल्य ५ न. पै.


> महाराष्ट्राचा महिमा सांगण्यासारखा नसला तरी महाराष्ट्राचे स्मरण झाल्याबरोबर मला पहिले स्मरण ज्ञानदेव महाराजाचे होते. आणि त्यांनी जो बोल काढला तो आठवतो.
>
> माझा मराठाची बोल कौतुके
> अमृताते पैजा जिंकें ॥
>
> —विनोबा

# जनतेवर ज्यांचे प्रेम व भक्ति असेल त्याला स्वस्थ बसणे अशक्य आहे

## आता डळमळीत राहणे गुन्हा ठरेल —ढेबरभाई



विनोबाजी महाराष्ट्रात आलेले आहेत तेव्हा त्यांचा अधिकाधिक लाभ कसा करून घेता येईल ह्याचा विचार आपण करावा. संत आपल्यासाठी काही इच्छित नसतात. जगाला रागद्वेष विरहित सल्ला देण्याचे काम ते करीत असतात.

राजनैतिक व आध्यात्मिक असे दोन प्रवाह जगात वाहतांना दिसतात. पण महाराष्ट्रात ते भिन्न पडलेले नाहीत. येथील राजकारणी पुरुषांनी आध्यात्माचे अधिष्ठान सोडले नाही आणि अध्यात्मिक विभूतींनी सामाजिक प्रश्न कधी डोळ्याआड केलेले नाहीत.

विनोबांचे स्थान आज भारतात अनन्य आहे. मी आज मगनवाडीतील रिसर्चच्या कामाच्या निमित्ताने आलो, तेथे पाच पंचवीस लोक औद्योगिक रिसर्चच्या कामात लागले आहेत. आणि येथे पवनारला सुद्धा अेक रिसर्चचा प्रयोग होत आहे. मगनवाडीचा बाह्य रिसर्चचा प्रयोग तर पवनारचा हा अंतरातील रिसर्चचा प्रयोग. आध्यात्मिक शोधाचे बळ भौतिक शोधाच्या पाठीमागे नसले तर ते फार दिवस प्रगति करु शकत नाही. पाश्चिमात्य राष्ट्रांच्या लक्षात यायला लागले आहे की भौतिक प्रगति ज्या वेगाने त्यांनी केली त्या वेगाने आंतरिक विकास न साधल्यामुळे फार मोठा धोका त्यांच्या संस्कृतीला निर्माण झाला आहे.

भारतातील साधनसंपत्ति आणि भारतातील आध्यात्मिक संपदा पाहून जगातील लोक स्तंभित होतात. विनोबांना पाहून दंग राहतात. असा देश जगातील राष्ट्रांच्या पायाशी का जातो ह्याचे त्यांना आकलनच होत नाही. आमचा आदर्श किंवा आमच्यातील व्यावहारिक प्रवृत्ति जेव्हा आमच्या समाज जीवनाशी जोडल्या जातात तेव्हाच त्यांच्यात तेज प्रगट होते. जगात कोरिया, जर्मनी, व्हीएटनाम, लाओस ह्यांचे तुकडे झाले आहेत. मलाया त्याच मार्गावर आहे. हिंसेने प्रश्न सोडविण्याचा मार्ग कुंठित झाला आहे. त्यामुळे ह्या तडजोडी निघतात परंतु मनातील हिंसा गेलेली नाही. जसा एखादा दारूड्या दारूच्या शिशीकडे जातो पण तेथे बसलेला साप पाहून त्याला दारूच्या शिशीला स्पर्श करण्याची हिंमत होत नाही. तसेच आज हिंसेची प्रवृत्ति गेली नाही. मोठ्या बलवान राष्ट्रांना ती शक्ति वापरण्याचा मोह अनावर होतो तेव्हा ते तिकडे वळतात पण तो सकलसंहारक ॲटम, हायड्रोजन बाँब पाहून पुन्हा मागे येतात. आता तर जगातील कोणत्याहि जड वस्तूंचा विनाश न करता सबंध प्राणिजात नष्ट करणाऱ्या विषारी बाँबचाहि शोध लागला आहे.

अशा ह्या जगात हिंसेचा अहिंसा हा विकल्प आहे असे सांगणारी आमची ही पागल लोकांची जमात आहे. पण त्यासाठी आमच्याजवळ अदम्य आत्म विश्वास असावयास हवा.

अमेरिकेच्या प्रेसिडेंट रुझवेल्टचे उदाहरण घ्या. त्याचे दोन्ही पाय पक्षघाताने खतम झालेले होते. त्याला पेटीत झोपवून ठेवावे लागे. बसवायचे असले तर सर्व बाजूने फळ्या लावाव्या लागत. पण तो शरीराने पंगु असला तरी आपल्या निश्चयाच्या बळावर त्याने ४ मार्च १९३३ साली १ कोटी ७० लाख बेकारांपैकी ८० लाख लोकांना काम दिले. आणि बाकीच्यांनाहि तात्पुरती, कामे, देवविली. त्याने तेथील अधिक निर्माण होणाऱ्या धान्याचा प्रश्न सोडविला. भाव धान्याचे कमी होऊ नये म्हणून शेतकरी धान्य जाळायचे. त्याने एक ठराव आणला आणि शेतकऱ्यांचे सर्व धान्य सरकार खरेदी करील अशी व्यवस्था करून ठेवली. त्यामुळे आता अमेरिकेचा शेतकरी वाटेल तेवढ्या धान्याचे उत्पादन करू शकतो. देशात दोनवर्षे लोकांना पुरेल एवढे धान्य असलेच पाहिजे असा दंडक त्याने घालून दिला व त्यामुळेच आज अमेरिका जगाला अडीअडचणीत धान्य पुरवूं शकते

आमच्याकडे भाकरा–नानगल, दामोदर आदि धरण योजना बनतात. धरण बनले की सरकारला वाटते आपले काम संपले. परंतु अमेरिकेत एक टेनेसी व्हॅली प्रोजेक्ट आहे. त्याअगोदर त्या तुफानी नदीमुळें लाखो एकर जमीन पडित पडायची. सरकारने स्वतंत्र कायदा करून ठिकठिकाणी त्या नदीला धरणच बांधले नाही, तर उत्तम शेती, घरे व विश्वविद्यालये इ. सर्वप्रकारचे संपूर्ण जीवन तेथ उभारले. आमच्या देशातहि हा आदर्श आम्ही समोर ठेवला पाहिजे व केवळ धरणे बांधण्यावर संतोष न मानता सर्वांगी योजना धरण बांधतांना केली पाहिजे.

अमेरिकेसारख्या औद्योगिक देशातहि अशा तऱ्हेने सरकारने शेतीला संपूर्ण संरक्षण दिले आहे. आणि आजहि अमेरिकेच्या सरकारवर उद्योगपति किंवा मजुरापेक्षा शेतकऱ्यांचाच अधिक प्रभाव आहे.

तेव्हा शेतकऱ्यांना मजबूत करूनच भारत पुढे जाईल. शेतकऱ्याला लालूच दाखवूनहि मज़बूत करण्याचा बाह्य प्रयत्न होऊ शकतो किंवा विनोबांच्या पद्धतीने त्याला आंतरिक नैतिक बल वाढविण्यास सहाय्य करूनहि तो होऊ शकतो. जेव्हा एक नैतिक वायुमंडळ तयार होते व त्यातून जे नेतृत्व प्रगट होते ते खरोखर अधिक प्रभावी व टिकाऊ असते. विनोबांची इच्छा आहे येथील शेतकऱ्यांनी देशाचे नेतृत्व करावे. म्हणून त्यांच्यात नैतिक सामर्थ्य निर्माण करण्याचा त्यांनी प्रयोग आरंभिला आहे. किसानाच्या नावावर मते तर मिळवितात. परंतु त्यांची नैतिक शक्ति वाढल्याशिवाय राष्ट्राचे सुकाणु त्यांच्या हाती येणार नाही. पण आज भारतात मेहनत एकजण करतो व वाचाळ राज्य करतो. विनोबांना अशा राजकारणात रस नाही. म्हणून ते शेतकऱ्यांची शक्ति वाढवीत आहेत. दुसऱ्याची जमीन, संपत्ति हिसकावून घेणे सोपे काम आहे. पण स्वतःची संपत्ति दुसऱ्याला देण्यात अधिक शक्ति लागते. त्यामुळे नैतिक मूल्यावर म्हणजे न्यायनीतीवर आधारलेला नवा समाज जन्माला येत आहे.

www.vinoba.in

थोडी थोडी जमीन वाटली तर सर्वच उपाशी राहतील असा प्रश्न करतात ? का उपाशी राहतील; गावातील अेकमेकांच्या गरजा भागविण्यासाठी आम्ही उद्योग उभे करू. सर्वांना काम देण्याची व लोकांच्या जीवनावश्यक गरजा गावातच भागविण्याची शक्ति शेती, गोपालन आणि ग्रामोद्योगात आहे.

इत:पर हिंसा की अहिंसा ह्या संशयात जो राहील तो समाजाची कसलीच सेवा करू शकणार नाही. हिंमतपूर्वक पाऊल टाकावे लागेल. जगाकडे चौफेर नजर पोहचवून निर्णयावर यावे लागेल. आज लढाईचा रस्ता बंद झाला आहे. तेव्हा दूसरा रस्ता कोणाला सूचत नाही म्हणून जगाचे प्रश्न सुटत नाहीत; जसेचे तसे पडले आहेत. शांतिसेना आणि अहिंसेचा विचार समोर येतो. ही आजचीच गोष्ट नाही. फार पूर्वीच हा प्रश्न गांधीजींनी इंग्लंडच्या लोकासमोर उपस्थित केला होता. महायुद्ध जेव्हा सुरू झाले तेव्हा To Every Englishman प्रत्येक इंग्रजास संबोधून गांधीजींनी अेक पत्र प्रकाशित केले होते. त्यात त्यांनी लिहिले, तुम्ही आज आपली शस्त्र-शक्ति वाढवून दुसऱ्यावर मात करू पाहता पण तुमच्यापेक्षाहि अधिक शस्त्र तयार करणारा कोणी निघेल तेव्हा तुमची शस्त्रे बेकाम ठरतील व त्याच्यापेक्षाहि आणखी तिसरा कोणी शस्त्रधारी पुढे येईल. देशाची आजची स्थिति अत्यंत स्फोटक आहे. अेका बाईने आज मला सांगितले की १० किलो गव्हाचे तिला १७ रु. द्यावे लागले. ६८ रुपये मणाप्रमाणे धान्य खरेदी करणारे किती लोक ह्या देशात निघू शकतील ? भारतातील सर्वांत खालच्या पातळीवर नांदणाऱ्या आदिवासी लोकाजवळ तर वर्षभरातहि येवढी रक्कम येत नसेल. भारतात आकडे प्रसिद्ध केले जात नाहीत. सरकारने कमिटी त्यासाठी बनविली होती. त्या कमिटीने दिलेला अहवाल प्रकाशित करण्याच्या चर्चा चालतात, तयारी दर्शविली जाते. परंतु पुन्हा तो विचार रद्द करतात. कारण त्यांना ते आकडे प्रसिद्ध करण्याची भीति वाटते. आकडे प्रसिद्ध करण्याची सुद्धा आम्हाला भीति वाटते तर जे लोक प्रत्यक्ष ते जीवन भोगत असतील त्यांची काय दशा असेल ?

ह्या देशात १० टक्के लोकाजवळ देशाची ३६ टक्के संपत्ति आहे आणि ३६ टक्के लोकाजवळ केवळ देशाची १० टक्केच संपत्ति आहे. आणि १टक्के लोकांजवळ देशातील १७टक्के जमीन आहे आणि १७टक्के लोकाजवळ केवळ १टक्के जमीन आहे. तेव्हा हे सर्व पाहून भीति वाटायला लागते की ह्याचा स्फोट झाला तर तो ॲटमबाँबपेक्षाहि भयंकर ठरेल. परंतु भारतातील लोक सहिष्णु आहेत, दबलेले आहेत म्हणून हे गाडे चालले आहे.

तेव्हा ही परिस्थिति बदलण्यासाठी विनोबांचा मार्ग आम्हाला पकडायचा आहे की अन्य मार्गाचा अवलंब करावयाचा आहे ह्याचा विचार करा. जनतेबाबत आमच्या मनात भक्ति व प्रेम असेल तर हे दु:ख निवारण करण्यासाठी आम्हाला आमचे विचार स्पष्ट केले पाहिजेत. ह्यावेळी डळमळीत राहणे गुन्हा ठरेल. स्वराज्य मिळाल्यानंतर पंधरा सोळा वर्षे हे खपून गेले. पण आता आम्हाला स्पष्ट निर्णयावर आले पाहिजे.

आता हळू हळू परिस्थिति आम्हाला अनुकूल होऊ लागली आहे. सरकारलाहि आता हा विचार पटू लागला आहे. चौथ्या योजनेत अडीच कोटी लोकांना काम द्यावयाचे आहे. तेव्हा त्यांना कोणते काम आम्ही देणार ? कारखान्यात ती क्षमता आहे काय ? खेड्यापाड्यात कारखाने जाऊहि शकणार नाहीत. शेती-गोपालन व ग्रामोद्योग ह्यांच्याकडे आम्हाला यावेच लागेल. तेव्हा व्यवस्थित योजना व पक्का निश्चय ह्या शिबिरात करूनच जायचे आहे.

(महाराष्ट्र शिबिर उद्घाटनाचे भाषण ३।८।६४)

---०---

# ग्रामदान-वृत्त

## प्लॅनिंग कमिशनच्या सदस्यांचा ग्रामदानी गावात दौरा

प्लॅनिंग कमिशनने वर्धा जिल्ह्यातील म्हसाळा, भिवापूर, चिकनी, सुरगाव, नागझरी, सोनेगाव, आगरगाव, पळसगाव, विरूळ आणि नांदोरा ह्या दहा ग्रामदानी गावांची निवड सघन कामासाठी केली आहे.

श्री. त्रिलोकसिंग आणि श्री. श्रीमन्नारायणजी ह्यांनी पूर्वी म्हसाळा गावाला भेट दिली होती. ता. २ ऑगस्टला चिकनी आणि विरूळ गावांना त्यांनी भेट दिली आणि ग्रामदानोत्तर ग्रामनिर्माण कामाबाबत गावकऱ्यासोबत चर्चा केली.

त्यांच्या सोबत भारत सरकारच्या सहकार आणि समाजविकास खात्याचे उपमंत्री श्री. मूर्ति, भारत सहकारी खात्याचे कमिश्नर श्री. भार्गव, भारतीय खेडुत औद्योगिकरण विभागाचे अध्यक्ष श्री. अण्णासाहेब सहस्रबुद्धे, जिल्हा सहकारी बँकेचे अध्यक्ष श्री. वामनराव वसु, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष संतोषराव गोडे, चीफ एक्झिक्युटीव्ह ऑफिसर श्री. कांगा, कलेक्टर श्री. डांगे, श्री. बंग आदि मंडळी होती.

अन्नधान्याचा प्रश्न, महागाई, दफ्तर दिरंगाई, भ्रष्टाचार ह्यांनी लोकांची मने व्याकुळ झालेली दिसली. गावात धान्य वाढविणे, खादी ग्रामसभेद्वारा गावाचा कारभार इ. विविध विषयावर चर्चा झाली. एक दीड महिन्यात ह्या गावांनी आपल्या ग्रामोन्नतीच्या योजना आखाव्या असा निर्णय ह्या दौऱ्यात सर्वांनी मिळून घेतला.

---०---

## ग्रामस्थांचे संमेलन

(३ ऑगस्टच्या अंकावरून क्रमश: चालू)

ते म्हणाले सहकारी संस्था, विकास योजना आणि पंचायती ह्यांच्या मार्फत आम्ही देशाला वर उचलण्याचा प्रयत्न केला, परंतु साधनवंतालाच ह्यांचा लाभ होतो आणि गरीब बाजूलाच पडून राहतो असे दिसून आले. ग्रामदानाने मात्र गरीबाकडे पाहण्याची भावना बनते. व त्याला मदत मिळू शकते हे दिसून आले.

तेव्हा ह्या आंदोलनाचे केवळ आध्यात्मिक व नैतिक मूल्य ओळखून आम्ही इकडे आलो नाही तर माझ्या प्लॅनिंग कमिशनचा सदस्य व मूर्ति हे केंद्र सरकारचे डेप्युटि मंत्री ह्या आंदोलनाचे व्यावहारिक लाभ जाणून मदत करायला आलो आहोत.

तुम्ही पाहिले की केंद्र सरकार, प्रांतिय सरकार व जिल्हापरिषद तुम्हाला मदत करू इच्छिते. परंतु त्यांच्या मदतीची याचना कराल तर अर्थाचा अनर्थ होईल. तुमचा अनर्थ पुरुषार्थ क्षीण व्हावा किंवा शक्तिबाहेर तुम्हाला कर्जाच्या ओझ्याखाली दाबणारी मदत आम्ही देणार नाही.

सरकारी मदतीच्या लालचेने हे काम करायचे नाही तर विनोबांचा विचार पटला म्हणून हे काम करायचे आहे. तेव्हा कायदा होईपर्यंत किंवा बाहेरील मदत मिळेपर्यंत वाट पाहण्याची गरज नाही. त्यापूर्वीच तुम्ही काम चालू करा. म्हणजे ग्रामदानच करा, प्रार्थना चालू करा. गांवातील भांडणे गावात मिटवा, सफाई ठेवा व गांवात खादीचे उत्पादन सुरू करा.

ग्रामदानात भावनाच प्रमुख आहे. ती नसेल तर मग अंधारच होईल. नोकरशाहीच्या भरवशावर कोठलेच चांगले कामाची आशा करू नका. रशिया सारख्या कम्युनिस्ट देशातहि भ्रष्टाचार चरम सीमेला पोहचलेला आहे. तेव्हा लोकांनी स्वत:च आपली कामे हाती घेऊन ती चालविणे हाच त्यावर कारगर उपाय आहे. कार्यकर्त्यांनी लोकांना ह्या बाबतीत मदत करण्यासाठी गांवोगाव फिरावे.

---०---

संपादक :-श्री. गोपाळराव काळे, श्री. वसंतराव बोंबटकर,
प्रकाशक:-श्री. वसंतराव बोंबटकर,
मुद्रक:-गो. भा. जोशी, भास्कर प्रेस, वर्धा.
स्वामित्व:-महाराष्ट्र सर्वोदय मंडळ, मुंबई.

साम्ययोग दैनिक ता. ५-८-६४ अं.१२० र.नं.ए.न.२९५
विनोबा वार्ता, मगनवाडी, वर्धा ( म. राज्य)
श्री. ______________

www.vinoba.in